


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६८७. वा | गुरुवार | दि. २२ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चौकशी पथकाचा बुलढाण्यात रॅपीड दौरा

## ९९ कोटींच्या घोटाळ्या प्रकरणाच्या कागदपत्रे नेली सोबत,अहवालाची प्रतीक्षा

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी पुन्हा एकदा चौकशी पथकाने बुलढाण्याचा एक **रॅपीड दौरा** केला. थेट पुण्याहून आलेल्या काही अधिकाऱ्यांनी जिल्हा रुग्णालयाला भेट दिली व घोटाळ्यासंबंधी अनेक कागदपत्रे आपल्या सोबत नेल्याची माहिती आहे. आमदार संजय गायकवाड यांनी या घोटाळ्याप्रकरणी काही महिन्यांपूर्वी थेट विधिमंडळात प्रश्न उपस्थित केला होता. त्या अनुषंगाने अधिकाऱ्यांच्या पथकाने हा दौरा केला, असे बोलले जात आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचारासंबंधी गेल्या अनेक महिन्यांपासून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून हा घोटाळा जगासमोर उघड करण्याचा प्रयत्न करीत आहे. या घोटाळ्याची व्याप्ती प्रचंड असल्या कारणाने त्याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर स्वरूपाची कारवाई करणे अपेक्षित आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने कालच या संदर्भात वृत्त प्रकाशित करून, या घोटाळ्यातील दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात कशाप्रकारे टाळाटाळ केली जात आहे, भ्रष्टाचारात लिप्त अधिकारी कशाप्रकारे आपल्या वरीष्ठांना ठेंगा दाखवत आहेत आणि वरिष्ठ अधिकारी कशाप्रकारे हतबल होऊन कोणतीही कारवाई करण्यास धजावत नसल्याचे सविस्तर वृत्त प्रकाशित केले होते. खरे तर या घोटाळ्यात कारवाई करायची म्हटल्यास जिल्हा रुग्णालयात शासनाला मोठी **सर्जीकल स्ट्राईक** करावी लागणार आहे. त्याच अनुषंगाने अधिकाऱ्यांच्या चौकशी पथकाचा हा दौरा झाला, परंतु अशाप्रकारची चौकशी यापूर्वीही अनेकदा झाली, मात्र त्यातून

### पोस्टमार्टम ६६

काही निष्पन्न झाल्याचे दिसून येत नाही. जिल्हा रुग्णालयात कोरोना महामारीच्या काळात मोठ्या प्रमाणात औषधी व उपकरणांची खरेदी करण्यात आली होती. मात्र, या खरेदीतील एक मोठा भाग हा केवळ कागदोपत्रीच राहिला. **प्रत्यक्षात खरेदी केलेल्या साहित्याचा एक मोठा हिस्सा जिल्हा रुग्णालयात पोहोचलाच नाही. ही उपकरणे साहित्य व औषधी कुठे गडप झाली, याचा तपास आजपर्यंत कोणालाही लागला नाही.** खरे तर आता याच्या तपासासाठी सीबीआयलाच बोलवावे लागते की काय, अशी स्थिती आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने सर्वप्रथम या घोटाळ्यावर तसेच जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या अव्यवस्थेची लक्तरं वेशीवर टांगली आहेत. त्यानंतर आमदार संजय गायकवाड यांनी थेट विधिमंडळात आरोप केला होता की, जिल्हा रुग्णालयाच्या औषधी व उपकरणांच्या खरेदीत ९९ कोटींचा घोटाळा झालेला आहे. या घोटाळ्यानंतर मोठी खळबळ जिल्हाभरात उडाली होती. त्यानंतर राज्याच्या आरोग्य मंत्रींनी या घोटाळ्याची सविस्तर चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. याशिवाय भाजपचे नेते विनोद वाघ आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी या घोटाळ्यासंदर्भात आंदोलनाचा इशारा दिला होता. या सर्वांचा परिणाम असा झाला की, दोनदा वरिष्ठ अधिकाऱ्यांचे एक पथक या ठिकाणी येऊन चौकशी करून गेले. काही कागदपत्र घेऊन गेले. मात्र, या चौकशांचा अहवाल आजपर्यंत गुलदस्त्यात असल्याचे बोलले जात आहे.

**करोडो रुपयांचा आलेला विविध निधी हा फक्त कागदोपत्रीच दिसून येत आहे. या सर्व प्रकरणात लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्याची परवानगी घेऊन आता पर्यंत झालेल्या त्या चौकश्याच्या अहवाल व ऑन कॅमेरा तपासणीत येणारा भांडाफोड सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन करून दोषींना गजाआड करे पर्यंत हा लढा सुरू ठेवणार**

९९ कोटींच्या या घोटाळ्यात आकंठ बुडालेले नेहमी चर्चेतील अधिकारी आजही राजरोसपणे फिरत आहेत. काही अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या. त्या भ्रष्टाचारातील एक संशयित अधिकारी तर काही दिवसांपूर्वी दुसऱ्या एका भ्रष्टाचाराच्या प्रकरणात लाच घेताना रंगेहात पकडल्या गेला. याचा अर्थ कुठेही गेले तर भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची प्रवृत्ती मात्र बदलत नाही. खरे तर हा घोटाळा ९९ कोटींचा नसून, त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक आहे. शिवाय या घोटाळ्यात अनेकांचा सहभाग आहे. त्यामुळे हा खरे तर एक सामूहिक गुन्हा आहे. त्यामुळे या घोटाळ्याची सखोल चौकशी करावयाची असल्यास चौकशी पथकाला अनेक बाबींना तपासून पाहणे गरजेचे आहे. परंतु या स्थितीत एक दिवसापूर्वी पुण्याहून जे चौकशी पथक येऊन गेले, त्या पथकाने खूपच धावता दौरा बुलढाण्याचा केला आहे. त्यामुळे या चौकशी वर पुन्हा एकदा भलंमोठं प्रश्नचिन्ह आहे. कारण यापूर्वी झालेल्या चौकशांचे अहवाल अजून समोर आलेले नाहीत. अशा स्थितीत त्या समोर न आलेल्या अहवालांवरच हेही चौकशी पथक काम करणार असेल, तर हा घोटाळा कधीही सूर्यप्रकाशात येऊ शकत नाही. खरे तर चौकशी पथकाने एकीकडे अधिकाऱ्यांची चौकशी करणे गरजेचे आहे, तर दुसरीकडे हा घोटाळा बाहेर काढणारे लोकप्रतिनिधी, सामाजिक



जिल्हा सामान्य रुग्णालय 'एक' अबब करोडो रुपयांचे भ्रष्टाचार अनेक

**जिल्हा सामान्य रुग्णालय तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ प्रेमकुमार पंडित व डॉ. नितीन तडस यांच्या कार्यकाळातील करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणातील गुंतागुंती प्रकरण व झालेल्या बहुचर्चित चौकशी अहवालाची सत्यता भ्रष्टाचारातून जमवलेली करोडो रुपये संपत्ती/अपसंपदा चा पोस्टमार्टम पुढील प्रत्येक सत्रात**

कार्यकर्ते तसेच पत्रकारांशीही संवाद साधणे गरजेचे आहे. मात्र याची कोणतीही गरज चौकशी पथकाला वाटली नाही, हे खरे तर खूप मोठे आश्चर्यच आहे. घोटाळ्याची व्याप्ती, भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी अधिकाऱ्यांची धडपड, यापूर्वीच्या चौकशांचं झालेलं भजं हे सर्व पाहता ही नवीन चौकशी समिती खरंच भ्रष्टाचार खणून काढू शकेल का? जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाऱ्यांचे खरे चेहरे उघड होतील का? भ्रष्टाचाऱ्यांवर खरंच कारवाई होणार का? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. एकीकडे ही जरी गंभीर स्थिती असली तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज जनतेच्या बाजूने खंबीरपणे लढत राहणार, जनतेला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करीत राहणार, तसेच भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई होण्यासाठी जोरदार प्रयत्न करीतच राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात

## विवाहितेचा छळ; पतीसह चौघांवर गुन्हा

**जनसंचलन/मोताळा**

विवाहितेचा शारिरीक व मानसीक छळ तसेच चारित्र्यावर संशय घेवून मारहाण तर माहेरुन २लाख रुपये आणण्यासाठी शिविगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी, पतीसह चौघांवर २० फेब्रुवारी रोजी बोराखेडी पोस्टे. ला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मलकापूर तालुक्यातील निमखेड येथील हर्षदा विकास खवले यांनी बोराखेडी पोस्टे. ला दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, त्यांचे लग्न जळगाव खांदेश जिल्ह्यातील हिंगणा भोटा येथील विकास खवले यांच्यासोबत झाले आहे. पती विकास हा फिर्यादीचा चारित्र्यावर संशय घेवून मारहाण केली. तर वैशाली संतोष कांडेलकर, भावेश संतोष कांडेलकर, देवेश संतोष कांडेलकर यांनी माहेरुन २ लाख रुपये आणण्यासाठी शिविगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या फिर्यादीवरुन बोराखेडी पोलिसांनी आरोपी पती विकास खवले याच्यासह वैशाली कांडेलकर, भावेश कांडेलकर, देवेश कांडेलकर रा. थेरोळा ता. मुक्ताईनगर यांच्यावर भादंवीचे कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास ओएसआय. मधुकर महाजन हे करीत आहे.

## माहेरी आलेल्या ३३ वर्षीय महिलेचा मृत्यू

**जनसंचलन/मोताळा**

माहेरी आलेल्या महिलेची तब्येत खराब झाल्याने तीला जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. सदर महिलेचा मृत्यू झाला. याप्रकरणी बोराखेडी पोस्टे.ला मर्ग दाखल करण्यात आला. तालुक्यातील पिंप्री गवळी येथील लता मुकेश अंभोरे ही महिला एका महिन्यापुर्वी तरोडा येथे माहेरी आली होती. तीला टीबी. चा आजार असल्याने तीची तब्येत खराब झाल्याने तीला जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान लता अंभोरे यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी मृतकाचे पती मुकेश मोतीराम अंभोरे यांचा जबाब नोंदविला. याप्रकरणी बोराखेडी पोलिस स्टेशनला १७४ जा. फौ. नुसार मर्ग दाखल केला असून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. पुढील तपास पोलिस करीत आहेत

# विशाल नरवाडे यांच्या नाविण्यपूर्ण प्रयोगाचे पहिले पाऊल यशस्वी...

## कॉपीमुक्त परीक्षेसाठी ऑनलाईन संनियंत्रण प्रणालीचे यश सकारात्मक




**जनसंचलन/बुलढाणा**

विद्यार्थ्यांच्या उज्वल शैक्षणिक भवितव्यासाठी भयमुक्त व कॉपीमुक्त निकोप परीक्षेसाठी बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या परीक्षा कक्ष ऑनलाईन संनियंत्रण प्रणालीला आज पहिल्याच दिवशी व्यापक प्रतिसाद मिळाल्याचे आशादायक चित्र दिसून आले आहे. दरम्यान आज पहिल्याच दिवशी विशाल नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यान्वित करण्यात आलेल्या वॉर रूम व नियंत्रण कक्षास तब्बल एक हजार परीक्षा कक्षातील हालचालींवर सुक्ष्म नियंत्रण ठेवण्यास प्रशासनास यश आले आहे. देशाची भावी पिढी ही गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणातून घडली पाहिजे. त्यामुळे परीक्षा केंद्रावर होणारे गैरप्रकार व कॉपीची कुप्रथा मोडीत काढण्यासाठी यावर्षी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली असून यापुढे परीक्षेला कॉपी नाही , अन् चुकीला माफी नाही असा सज्जड इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी मंगळवारीच एका पत्रकार परिषदेव्दारे सर्व यंत्रणेस दिला होता. यापार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यातील इयत्ता १२ वी च्या ११७ परीक्षाकेंद्रावर सुमारे १३५० वर्गखोल्यांमध्ये परीक्षा देणाऱ्या ३३ हजार ७५७ विद्यार्थी, पर्यवेक्षक, केंद्रसंचालक, परिरक्षक इत्यादी सर्व घटकांवर झूम ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टिमचा नाविण्यपूर्ण प्रयोग करण्यात येणार असल्याची माहिती विशाल नरवाडे यांनी दिली होती. त्याअनुषंगाने प्रशासनाने युध्दपातळीवर प्रयत्न करून वॉर रूम व नियंत्रण कक्षाची स्थापना केली. यामाध्यमातून आज इयत्ता १२ वी च्या पहिल्याच पेपरच्या दिवशी सकाळपासूनच मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी इत्भूत आढावा घेतला. तसेच सकाळी ९ वाजता पर्यवेक्षक, केंद्रसंचालक, परिरक्षक , गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी यांची ऑनलाईन बैठक घेऊन सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनतर सकाळी १० .३० ते २.३० या वेळेत परीक्षा कक्षामध्ये परीक्षा काळातील लाईव्ह फीड मॉनिटरींग करण्यात आले. पहिलाच प्रयोग असल्यामुळे तांत्रिक अपरिहार्यता, कनेक्टिव्हीटी इत्यादी सर्व अपवाद वगळता आजसाठी निश्चित केलेल्या उदिष्टाप्रमाणे तब्बल एक हजार परीक्षा कक्षामध्ये ही यंत्रणा सुरळीतपणे काम करू शकली. हे प्रशासनाच्यादृष्टीने मोठे यश असल्याचे म्हणता येईल. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी आजच्या प्रभावी अंलबजावणीबाबत समाधान व्यक्त केले. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केलेल्या या नाविण्यपूर्ण प्रयोगाबद्दल शिक्षक, पालक व विद्यार्थी यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याच्या दृष्टीने आपल्याकडून होणाऱ्या चुका सर्व घटकांच्या निदर्शनास आणून देणे हा एकमेव उद्देश या प्रयोगामागे असल्याची भवना व्यक्त केली. तसेच सर्व घटकांच्या मोलाच्या सहकार्याबद्दल धन्यवाद दिले. यापुढे विद्यार्थ्यांनी कुठलीही भिती न बाळगता आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करून आत्मविश्वासपूर्वक ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही विशाल नरवाडे यांनी केले आहे. माध्यमिक शिक्षणाधिकारी सिध्देश्वर काळुसे यांनी याविषयी बोलतांना सांगितले की, आजचा पहिला पेपर हा जिल्ह्यातील सर्व ११७ परीक्षा केंद्रांवर शांततेत व सुरळीत पार पडला. कुठेही गैरप्रकार घडल्याची एकही तक्रार विभागाकडे प्राप्त झालेली नसल्याची माहिती त्यांनी दिली.


# साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंद्यांना ऊत...

## अवैध धंदे बंद न केल्यास माजी सरपंच साबेर पठाण यांचा आमरण उपोषणाचा इशारा



**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत गावागावात अवैध धंदयांना ऊत आला आहे . मुख्य रस्त्यावर गावागावात वरली मटक्याची दुकान जसे भजे जिलेबी ची दुकान असतात त्याप्रमाणे ठिकठिकाणी थाटली आहे.अवैध दारुची विक्री मोठया प्रमाणात सुरू असून जुगार वरली मटक्याच्या नादाला तरुण , किशोर वयीन मुले मोठया प्रमाणात वळली आहेत पोलीसाच्या अभयाने जुगाराचे धंदे सैराट आले आहेत जुगाराच्या आहारी तरुण पिढी बर्बाद होत असून त्याचे काहीच सोयर सुतक न बाळगता पोलीसांचा झिंगाट सुरु आहे त्यामुळे पोलिसांच्या अभयाने सुरू असलेले हे अवैध धंदे तात्काळ बंद करावे अन्यथा आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा भाजप कोर कमिटीचे सदस्य तथा मलकापूर पांग्रा ग्रामपंचायत चे माजी सरपंच साबेर पठान यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे . या संदर्भात दिलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की. साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत गावागावात अवैध धंद्यांना अक्षरशा ऊत आला आहे वरली मटका खेळण्यासाठी लोक रोज मजुरी बुडवून दिवसभर खेळण्यासाठी थांबतात त्यामुळे त्यांच्या संसाराची राख रांगोळी होत आहे पोलीस मात्र याची चिंता न करता अवैध धंद्यांना अर्थपूर्ण पाठ बळ देत आहे अवैध धंदे करणारे पोलिसांसोबत त्यांची उठबैस असल्याने सर्वसामान्य लोक अवैध धंद्यांची तक्रार करण्यास धजावत नाही पूर्वी चोरीछुपे असलेले धंदे आता मुख्य रस्त्यावर आले आहेत असे असताना कारवाई साठी पोलिसांना हे अवैद्य धंदे का दिसत नाहीत असा संतप्त सवाल देखील या निमित्ताने उभा राहतो अवैध धंदे सुरू असल्यामुळे चोऱ्या चपाट्या होत नाही लोक गुतून राहतात असा अजब प्रतिक्रिया अवैध धंद्यांवर पांघरून घालण्यासाठी पोलिसांकडून देण्यात येतात त्यामुळे धंद्यावर कारवाई कशी होणार साखरखेडा पोलीस स्टेशनला लागूनच बीबी पोलीस स्टेशन आहे या ठिकाणी देखील बीबी पोलीस स्टेशन ठाणेदार सोनकांबळे यांच्या आशीर्वादाने क्लब सुरू आहे मात्र पोलीस कारवाई करत नाही या संदर्भात तात्काळ कारवाई झाली नाही तर येथे एक तारखेपासून आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा देखील निवेदनाद्वारे माजी सरपंच साबेर पठाण यांनी दिला आहे




# वन बुलढाणा मिशनच्या यात्रेत गावागावात गुंजतोय परिवर्तनाचा सुर...

## जिल्ह्याच्या मागासलेपणाचा कलंक पुसण्यासाठी सरसावली तरुणाई...

**जनसंचलन/बुलडाणा**



कुठलीच राजकीय पार्श्वभूमी नसताना केवळ जिल्ह्याला मागासलेपणाचा लागलेला कलंक पुसून टाकण्याचे कंगण उराशी बाळगून संदीप शेळके यांनी वन बुलढाणा मिशन च्या माध्यमातून संपूर्ण जिल्हा पिंजून काढायला सुरुवात केली आहे.. यापूर्वी संदीप शेळके यांनी सहकार, उद्योजकता, शिक्षण या क्षेत्रासह विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत.. तर आता जिल्हयाच्या सर्वांगीण विकासाची ब्ल्यू प्रिंट घेऊन ते लोकसभा निवडणुकीच्या रणांगणात उतरणे आहेत.. त्यांनी मोताळा तालुक्यातील नळकुंड येथून आपल्या परिवर्तन रथ यात्रेला सुरुवात केली आहे, मोताळा आणि शेगाव अशा दोन तालुक्यांमध्ये या परिवर्तन रथ यात्रेला सर्वच वयोगटातील नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत असल्याने विरोधकांचे धाबे चांगलेच दनानल्याच चित्र पाहायला मिळत आहे. तर जिल्ह्याला लागलेला मागासलेपणाचा कलंक पुसून टाकण्यासाठी तरुणांकडून गावागावात परिवर्तनाचा आवाज गुंजतोय...

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## सरपंच बसले पुन्हा उपोषणाला

## उपोषण स्थगित करून सरपंचाची केली दिशाभूल

### सार्वजनिक बांधकाम उपविभाग देऊळगाव राजा यांचा प्रताप...

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

सिंदखेड राजा तालुक्यातील ग्राम वाघजाई येथील अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी सरपंच गजानन सानप हे ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणास पुन्हा बसले आहेत सविस्तर असे की वाघजाई फाटा ते जळगाव गावा प्रयंत डांबरीकरण व पुलासह हे काम सार्वजनिक उप विभाग देऊळगाव राजा यांच्या अंतर्गत मागील वर्षी नाथाभाऊ दराडे यांनी केले असून त्यांनी काम निकृष दर्जाचे व इस्टीमेट नुसार केले नाही व गावातील काम अपूर्ण सोडले सांड पाणी जाण्यासाठी नाली काढल्या नाही यामुळे गावातील पाणी रोडवर साचून डबके साचून आरोग्य धोक्यात येत आहे व गाड्या स्लीप होऊन काहीना अपंत्व आले आहे हे काम पूर्ण व्हावे यासाठी सरपंच यांनी सबंधित विभागाला निवेदन देऊन सुद्धा काम पूर्ण केले नाही सबंधित अभियंता यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली या मुळे सरपंच यांनी २९/९/२३ रोजी आमरण उपोषण सुरू केले होते .पण सिंदखेड राजा विधानसभेचे माजी आमदार तोताराम कायंदे ,शशिकांत खेडेकर व किनगाव राजा पोलीस स्टेशन चे ठाणेदार दत्तात्रय वाघमारे यांच्या मध्यस्थीने व सबंधित विभागांचे कार्यकारी अभियंता उपविभागीय



अभियंता कनिष्ठ अभियंता यांनी हे उपोषण काही लोकांच्या व भूमी अभिलेख विभाग यांच्या काही अडीअडचणी मुळे सबंधित भूमी अभिलेख यांच्या कडून मोजणी पूर्ण करून घेऊ व अतिक्रमण उठवून काम दोन महिन्यात पूर्ण करू असे लेखी आश्वासन देऊन हे उपोषण एका प्रकारची सरपंच यांची फवणुक करून स्तगित केले . तेव्हा पासून आज ५ महिने झाले तरी सबंधित विभाग व ठेकेदार यांनी हे काम पूर्ण केले नाही .हा रोड गावात अत्यंत खराब झाला असून तालुका जाणे येण्यासाठी वाहन धारक यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे .सरपंच यांनी सबंधित विभाग व ठेकेदार यांना फोन करून काम चालू करण्याचे आव्हान केले तरी त्यांनी दुर्लक्ष केले आहे .हे काम पूणत्वाकडे न्यावे यासाठी सरपंच यांनी विभागाकडे लेखी पत्र दिनांक १८/२/२४ प्रयंत काम पूर्ण करा नाहीतर १९ फेब्रू पासून उपोषणास बसू असे पत्र दिले होते .त्यांनी काम पूर्ण न केल्यामुळे परत सरपंच उपोषणास बसले आहे .

## शिवराय नसते तर महाराष्ट्राचा इतिहासच नाही तर भूगोल वेगळा असता- जयश्रीताई शेळके...

### मोहदरी येथे शिव व्याख्यान : माता-भगिनींसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनसंचलन/मेहकर**

तारुण्यात वादळालाही शमवण्याची ताकद असली पाहिजे. छत्रपती शिवरायांनी तारुण्यात क्रांती घडवली. तसेच प्रत्येक महापुरुषांनी तारुण्यात क्रांती घडवली आहे. छत्रपती शिवराय नसते तर कदाचित इथला इतिहास वेगळा राहिला असता. केवळ इतिहासच नाही तर महाराष्ट्राचा भूगोल वेगळा राहिला असता. तरुणांनी शिवरायांचा विचार अंगिकारावा, असे प्रतिपादन काँग्रेसच्या प्रदेश सचिव जयश्रीताई शेळके यांनी केले. तालुक्यातील मोहदरी येथील ग्रामस्थांच्यावतीने १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी आयोजित शिवजयंती उत्सव सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी मोहदरीच्या सरपंच लक्ष्मीताई बोढे, मा. उपसभापती मीताताई म्हस्के, निताताई लोढे, गंगुताई लोढे, निताताई लोढे, ललीताताई इंगळे, करणखेडच्या मा. सरपंच अनिताताई गायकवाड, अर्चनाताई शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने माता- भगिनी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. पुढे बोलतांना जयश्रीताई शेळके म्हणाल्या, आयुष्यात वय खुप महत्वाचे असते. योग्य वयात योग्य कामे मार्गी लावता यायला पाहिजे. प्रत्येक महापुरुषांनी कमी वयात क्रांतीकारी काम केल्याचे आपणास दिसून येते. छत्रपती शिवरायांनी १६ व्या वर्षी तोरणा किल्ला जिंकला. छत्रपती संभाजीराजांनी १४ व्या वर्षी बुद्धभूषणम हा ग्रंथ लिहला. क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी वयाच्या २१ व्या वर्षी मुलींची पहिली शाळा काढली. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी वयाच्या २३ व्या वर्षी कृष्ठरोग्यांसाठी आपल्या संस्थानांमध्ये व्हिक्टोरिया असायलमची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वयाच्या २९ व्या वर्षी १९२० साली मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. या वयात आपली मुलं काय करतात? याबाबत पालकांनी विचार करण्याची गरज असल्याचे जयश्रीताई शेळके म्हणाल्या. राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ, शहाजी राजे यांनी शिवबांवर योग्य संस्कार करुन त्यांना छत्रपती म्हणून घडवले. शिवराय मोहिमेवर असतांना जिजाऊ स्वराज्याचा संपूर्ण मुलकी कारभार पाहायच्या. छत्रपती संभाजी महाराजांनी तर दोन पावले पुढे जाऊन आपली पत्नी येसूबाई यांना सर्व अधिकार दिले होते. त्यांना स्वतंत्र राजमुद्रा दिलेली होती. सही व




शिक्क्याचे अधिकार दिलेले होते. याचा अर्थ स्वराज्यात मातृशक्तीला महत्वाचे स्थान आणि निर्णय प्रक्रियेत पुरेपूर स्वतंत्र होते, असे जयश्रीताई शेळके म्हणाल्या. आपण छत्रपती शिवाजी महाराज की जय म्हणतो. मात्र केवळ त्यांचा जयजयकार करुन चालणार नाही. तर त्यांच्या विचारानुसार वागले पाहिजे. शिवरायांनी आपल्या सैनिकांना सक्त ताकीद दिली होती की, शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका. शेतकऱ्यांच्या भल्याचे धोरण त्यांनी राबवले. शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत दिली. अडचणीच्या काळात त्यांना दिलेली कर्जे माफ केली. शेतकरी, कष्टकरी, स्वराज्यातील प्रत्येक नागरिक सुखी झाला पाहिजे यासाठी शिवराय अहोरात्र झटले, असे विचार जयश्रीताई शेळके यांनी मांडले.

## नक्षत्रांचे देणेने चिखली महासंस्कृती महोत्सवाचे उद्घाटन

**जनसंचलन/बुलडाणा**

सांस्कृतिक परंपरांचे आदान-प्रदान व्हावे यासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे चिखली येथे आयोजित महासंस्कृती महोत्सवाला ङ्गनक्षत्रांचे देणेफ कार्यक्रमाने सुरुवात झाली. आमदार श्वेता महाले यांनी दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी आमदार श्वेता महाले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, तहसिलदार माया माने आदी उपस्थित होते. सुरवातीला शाहिर डी. आर. इंगळे यांच्या समूहाने पोवाडा सादर केला. तालुका क्रीडा संकुलात दि. २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान तीन दिवसीय महासंस्कृती महोत्सव घेण्यात येत आहे. या महोत्सवास आज, दि. २० फेब्रुवारी रोजी सुरुवात करण्यात आली. ऋषिकेश रानडे यांनी गणपती बाप्पा मोरया, कानडा राजा पंढरीचा, लव कुश रामायण गाती, पूत्र मानवाचा आणि विठ्ठल नामाचा रे टाहो अशी भक्तीगीत सादर केली. आनंदी जोशी यांनी फुलले रे क्षण माझे, का रे दुरावा ही गाणी सादर केली.



ऋषिकेश रानडे आणि आनंदी जोशी यांनी चंद्र आहे साक्षीला, फिटे अंधाराचे जाळे आदी सुरेल गीते सादर केली. कार्यक्रमस्थळी बचतगटांच्या स्टॉल्सच्या माध्यमातून खाद्य संस्कृतीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच हस्तकला आणि पारंपरिक वस्त्रांचे दालन आणि पुस्तके विक्रीस ठेवण्यात आली आहे. सुरवातीला या दालनाला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, तहसिलदार माया माने यांनी भेट दिली. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी ङ्गनक्षत्रांचे देणेफ कार्यक्रमात गायक ऋषिकेश रानडे आणि आनंदी जोशी हे सुधीर फडके आणि आशा भोसले यांची मराठी, हिंदी गाणी सादर केले. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी बुधवार, २१ फेब्रुवारी रोजी जागर लोक कलेचाफ कार्यक्रमात पारंपरिक दंडार, भारुड, गोंधळ, पोवाडा, वासुदेव या लोककला सादर करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्रातील नामांकीत कवींचे कवी, हास्यकवी संमेलन होईल. त्यानंतर दीप्ती आहेर आणि समूह पारंपरिक लावणी सादर करतील. तसेच गुरुवार, २२ फेब्रुवारी रोजी ङ्गमहाराष्ट्राची लोकधाराफ या महाराष्ट्राची संस्कृती दर्शविणारा कला आविष्कार अनिरुद्ध जोशी आणि सहकलाकार सादर करतील. तसेच गौरी थोरात ह्या ङ्गराजमाता जिजाऊसाहेबफ यांच्या जीवनावर आधारित एकांकिका सादर करतील. महासंस्कृती महोत्सवात नागरिकांनी विनामूल्य प्रवेश आहे. नागरिकांनी सांस्कृतिक आणि लोककलांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

## सोमठाणा येथील विषबाधेची परिस्थिती नियंत्रणात...

**जनसंचलन/बुलढाणा**

लोणार तालुक्यातील सोमठाणा येथे झालेल्या विषबाधेची परिस्थिती नियंत्रणात आहे. यातील विषबाधा झालेल्या सुमारे १९२ जणांवर बीबी, लोणार ग्रामीण रुग्णालय आणि मेहकर येथे उपचार करण्यात आले. यातील सर्व जणांना कोणताही धोका नसल्याने रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे. तसेच वयोवृद्धांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. जिल्हा प्रशासन या संपूर्ण प्रकरणावर पूर्ण लक्ष ठेवून आहे. सोमठाणा येथे विषबाधा झालेल्या नागरिकांवर बीबी येथे १४२, मेहकर येथे ३५ आणि लोणार ग्रामीण रुग्णालयात १५ अशा एकूण १९२ नागरिकांवर यशस्वी उपचार करण्यात आले. विषबाधेची माहिती रात्रीपासूनच घेण्यात आली. यातील संपूर्ण नागरिकांवर रुग्णालयात उपचार करण्यात आले. विषबाधा झालेल्या नागरिकांची संख्या अधिक असल्याने ग्रामीण रुग्णालयात असलेल्या डॉक्टरांसह खासगी डॉक्टरांचीही या आपत्कालीन परिस्थितीत मदत घेण्यात आली. यातील कोणत्याही नागरिकांना



धोका पोहोचला नाही. त्यामुळे सर्व नागरिकांना उपचारानंतर रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली. याप्रकरणी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांना तपासाचे आदेश दिले आहे. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन विभागाने विषबाधा झालेल्या अन्नाचे नमुने घेतले आहे. या ठिकाणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण आणि डॉक्टरांच्या पथकाने भेट दिली. नागरिकांच्या वैद्यकीय सोयीसाठी दिवसभर वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले आहे. विषबाधा झालेल्या सर्व नागरिकांची प्रकृती स्थिर आहे. या संपूर्ण परिस्थितीवर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील हे वैयक्तिकरित्या लक्ष ठेवून आहेत.

# महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना विविध मागण्यासाठी महावितरण विभागासमोर राज्यव्यापी आंदोलन




**जनसंचलन/ बुलढाणा**

महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटनेच्या वतीने विविध माग्ण्यासाठी राज्य भर राज्यव्यापी आंदोलन सुरू आहे.दि २१ फेब्रुवारी रोजी बुलढाणा महावितरण कार्यालय समोर आंदोलन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन व वीज कंपनी प्रशासनाने महावितरण,महापारेषण व महानिर्मीती कंपनीतील कंत्राटदारांवर होणाऱ्या प्रशासकीय खर्चात कपात केल्यास दर वर्षी सुमारे २ अब्ज ३२ कोटी रुपये सरकारच्या तिजोरीत पडू शकतात या साठी कंत्राटदार बाजूला करून कंत्राटदार विरहित रोजगार द्यावा, पगार वाढ करावी व वयाच्या ६० वर्षा पर्यंत रोजगार द्यावा या व अन्य महत्व-पूर्ण प्रलंबित मागण्यांसाठी ९ फेब्रुवारी पासून राज्यातील सर्व जिल्ह्यात वीज निर्मिती केंद्र व वितरण ऑफिसवर क्रम बद्ध आंदोलन सुरू आहे. आज चौथ्या टप्यात राज्यभर कामगारांनी उत्साहात काम बंद आंदोलन सुरू केले असून याला चांगला प्रतिसाद मिळाला वितरण व पारेषणच्या नवीन भरतीला स्थगिती देऊन आधी अनुभवी व कुशल कंत्राटी कामगारांना मा.ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी जाहीर केलेल्या सुचने नुसार आधी अनुभवी व कुशल कंत्राटी कामगारांना वयात सवलत व विशेष प्राधान्य व आरक्षण द्यावे. भ्रष्ट कंत्राटदारांना व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. मा.ऊर्जामंत्री व वीज कंपनी प्रशास-नाने त्वरीत चर्चा करून कामगारांना न्याय द्यावा. अन्यथा चौथ्या टप्प्यात दि. २८ व २९ फेब्रुवारी रोजी २ दिवस लाक्षणिक काम बंद आंदोलन करण्याचा ईशारा महाराष्ट्र वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समिती २०२४ च्या वतीने आज देण्यात आला

ऊर्जामंत्री व प्रधान सचिव ऊर्जा यांनी संवाद साधला असता तर आंदोलनाची वेळ आली नसती, नागरिकांची गैरसोय झाली नसती कृती समितीच्या महत्वपूर्ण मागण्या या आहे सर्व कंत्राटी कामगारांना ३० % वेतन वाढ देण्यात यावी. रानडे समिती च्या शिफारशी त्वरित लागु करून कामगारांना एन. एम.आर.माध्यमातून कायम नोकरीत समाविष्ट करावेत. नोकरीत कायम करत नाही तो पर्यंत भ्रष्टाचार टाळण्यासाठी कंत्राटदार मुक्त रोजगार देण्यात यावा. ४ ऐवजी १५ लाख अपघा-त निधी, कुटुंबाला ५ लाखाचा मेडिक्लेम, मृताच्या वारसाला नोकरी. सेवा निवृत्ती च्या वेळी ग्रजुईटी मिळावी ई अन्य महत्वपूर्ण मागण्या आहेत. या आंदोलनाची शासनाने दखल न घेतल्यास दि ५ मार्च २०२४ पासून राज्यातील सर्व कामगार बेमुदत काम बंद आंदोलन करतील असा इश-ारा महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समिती २०२४ चे राज्य संघटक सचिन मेंगाळे व निमंत्रक रोशन गोस्वामी यांनी दिला.

# व्यापाऱ्याकडून शेतकऱ्याची ९० हजारांची फसवणूक



**जनसंचलन/ मलकापूर**

मलकापूर तालुक्यातील भालेगावा-तील व्यापाऱ्याने कापूस खरेदी करून ९० हजार चारशे रुपयांनी फसवणूक केल्याची तक्रार वाकोडी येथील शेतकऱ्याने एसडीपीओकडे केली आहे. अल्पभूधारक शेतकरी ललित ज्ञानदेव पाटील यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी मलकापूर यांच्याकडे २० फेब्रुवारीला तक्रार दिली. तक्रारीमध्ये २५ जुलै २०२२ रोजी भालेगाव येथील कापूस व्यापारी नीना डिगांबर घुले यांना पंधरा क्विंटल साठ किलो कापूस नऊ हजार रुपये प्रतिक्विंटल या दराने विक्री केल्याचे नमुद आहे. त्यांच्याकडून एक लाख चाळीस हजार चारशे रुपये दोन महिन्यांत देण्याचे ठरले. ठरल्याप्रमाणे दोन महिने झाल्यावर २६ सप्टेंबर २०२२ ला व्यापाऱ्यास कापसाचे मोबदल्याची रक्कम मागितली असता सुरुवातीला घुले यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. नीना घुले यांच्याकडे फोनद्वारे व प्रत्यक्ष भेटून तगादा लावल्यानंतर २८ डिसेंबर २३ रोजी रुपये पन्नास हजार चेकद्वारे दिले. उर्वरित रक्कम रुपये नव्वद हजार चारशे फेब्रुवारी २४ फेब्रुवारीच्या पूर्वी देण्याचे नीना घुले याने सांगितले होते. उर्वरित रकमेची नीना घुले याच्याकडे फेब्रुवारीच्या पहिले आठवड्यात मागणी केली असता पैसे देण्यास नकार दिला. तसेच धमकी दिली असल्याचे ललित ज्ञानदेव पाटील यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

# रोडरॉबरीतील आरोपी जेरबंद! १३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल केला जप्त

**जनसंचलन/बुलढाणा**

१४ फेब्रुवारी रोजी अंढेरा घाट वळण ते धोत्रानंदी दरम्यान जालना येथील एका स्टील कंपनीच्या व्यवस्थापकाकडील २७ लाख रुपयांची रोकड लुटणाऱ्या आरोपींचा छडा लागला असून, जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून ६ लाख रुपयांची रोकड, एका वाहन, मोबाईल असा एकूण १३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जालना येथील लोखंडी सळ्या निर्मितीच्या उद्योगातीत राजुरी कंपनीचे वसुली अधिकारी रामेश्वर श्रीमाली व चालक प्रमोद उल्हास कुडे हे बुलढाणा जिल्ह्यातून वसुली १४ फेब्रुवारी रोजी जालन्याकडे जात असतांना त्यांची कार अंढेरा घाट वळणावर अडवून त्यांच्याकडील २७ लाख रुपये धोत्रा नंदई शिवारात अज्ञात चोरट्यांनी लुटले होते. प्रकरणी अंढेरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान जालना येथे छत्रपती संभाजीनगर मार्गावर काही जण संशयितरित्या फिरत असल्याची माहिती जालन पोलिसांना मिळाली होती.त्यांनी संबंधितांचा माग काढला असता त्यांच्याकडे सहा लाख रोख व अन्य साहित्य व वाहन सापडले. मात्र जालना पोलिसांनी रोडरॉबरीमधील पाच आरोपींना अटक केली आहे. त्याचा स्त्रोत ते देऊ शकले नाही. परिणामी या प्रकरणाती कचरू श्रीकिसन पडूळ (३५, रा. मम्मादेवीनगर, जालना), बहादूर सुख्खूप्रसाद पासवान (४०, रा. चंदोली, उत्तरप्रदेश), विष्णू गोविंद बनकर (रा. दरेगाव, जि. जालना), दारासिंग बाबुसिंग राजपूत ( मोराडी मोहल्ला, जालना) आणि सुनील शिवाजी धोत्रे, रा. मदनेश्वर नगर, नेवासा, जि. नगर) यांना जालना पोलिसांनी ताब्यात घेते. तेव्हा त्यांनी १४ फेब्रुवारी रोजी केलेल्या रोडरॉबरीची माहिती दिली. त्यानंतर या सर्व आरोपींची माहिती अंढेरा पोलिसांना देण्यात आली. एका कामगारानेच दिली होती टिपया प्रकरणात कंपनीमधील एकाच कामगारानेच रोडरॉबरीसाठी टीप दिल्याची माहिती पोलिस तपासात समोर येत आहे. जवळपास १५ जणांच्या टोळीने ही रोड रॉबरी केल्याचे पोलिस तप-ासात समोर येत आहे. विशेष म्हणजे वसुली अधिकाऱ्याच्या वाहनाला जीपीएस बसवून त्यांच्या लोकेशनची इत्यंभूत माहिती दरोडेखोरांना पुरविल्याचेही पोलिसांच्या तापासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात पाच आरोपींना जालना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान आर-ोपींनाही लवकरच बुलडाणा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात येणार असल्याचे पोलिससुत्रांनी स्पष्ट केले. दरम्यान या प्रकरणातील आणखी दहा आरोपींचा सध्या जालना पोलिस शोध घेत आहे.

# नांद्राकोळी येथे शिवजयंती निमित्त प्रवाह शिक्षण, क्रिडा व बहुउद्देशीय संस्थेतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र पुस्तकाचे वाटप





**जनसंचलन/बुलडाणा**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती संपुर्ण राज्य भरात मोठ्या उत्साहात साज-री करण्यात आली आहे. विविध ठिकाणी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले आहे त्यामध्ये नांद्रा कोळी येथे छत्रपती शिवाजी महार-ाज यांची जयंती साजरी करण्यात आली आहे. यावर्षीच्या जयंती मध्ये विशेष उपक्रम राबविण्यात आ-लेले आहे.प्रवाह शिक्षण, क्रिडा व बहुउद्देशीय संस्था नांद्राकोळी तर्फे रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महार-ाज यांच्या जीवन चरित्र पुस्तकाची वाटप करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचं जीवन चरित्र आपणा सर्वांसाठी नेहमी प्रेरणादायक व दिशादर्शक आहे आपल्या भावी पिढीला खरे शिवराय कळाले पाहिजेत शिवरायांची विचार त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजे या हेतूने शिवजयंती निमित्त शहीद गो-विंद पानसरे लिखित छत्रपती शिवाजी महाराज कोण होते या पुस्तकाचे वाटप गावकऱ्यांमध्ये करण्यात आले आहे. पुरुष मंडळी,तसेच बहिणी,वृध्द,तसेच लहान बालकामध्ये मोठा उत्साह दिसून आला आहे.महाराजचे जीवन काय होते हे प्रत्येक माणसाच्या मनात जपून राहवे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दलित मित्र पुरस्कार माधव हुडेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून जाकीर शहा हे उपस्थित होते तर प्रास्ताविक विशाल काळवाघे यांनी केलेली आहे. तर यावेळी सरपंच संजय काळवाघे,उपसरपंच मनोज जाधव,संजय काळवाघे, अनिल राऊत,अनिल हिवाळे, अनिल खंडागळे, मोहन जाधव,वैभव काळवाघे शुभम काळवाघे आदी लोक उपस्थित होते

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958